

पुण्यनगरी

# आरोग्यजागर



। उत्तम आरोग्य । उज्ज्वल भविष्य । । पुणे, मंगळवार, ४ ऑगस्ट २०१५


# मस्तिष्कआवरणदाह (Meningitis) आणि होमिओपॅथी




होमिओपॅथी चिकित्सा व उपचार

डॉ. अमरसिंह निकम


मध्यवर्ती मज्जासंस्थेचा भाग असलेल्या आणि मज्जारज्जूभोवती असलेल्या आवरणाला मेनिन्जेस म्हणतात. या आवरणाचे तीन स्तर असतात. (बर्हिस्थ, मध्यस्थ, अंत:स्थ) या आवरणाची महत्त्वाची तीन कामे म्हणजे, १. मेंदू व मज्जारज्जूच्या कुठल्याही इजेपासून बचाव करणे. २. मेंदूला रक्तपुरवठा करणे. ३. मस्तिष्कमेरू द्रव (सी. एस.एफ.) वाहण्यासाठीची जागा. या मस्तिष्कआवरणाला दाह निर्माण होणे म्हणजे मेनिंजायटिस. हा एक आणीबाणीचा आजार आहे, ज्यावर ताबडतोब उपचार झाले नाहीत तर जीव धोक्यात पडू शकतो.

**कारणे-** १. जिवाणू, विषाणू किंवा बुरशी यांचा संसर्ग हे या आजाराचे प्रमुख कारण आहे. मुदतपूर्व जन्म झालेल्या, लहान बालकामध्ये असा जंतुसंसर्ग पटकन होतो. प्रतिकारक्षमता कमकुवत असलेले एड्सचे रुग्ण या आजाराला सहज बळी पडतात. अवयवांचे प्रत्यारोपण झालेल्या, डोक्याला दुखापत झाल्यामुळे नाकातील श्लेष्मआवरणामध्ये असलेले जंतू रक्तामार्फत मस्तिष्कआवरणापर्यंत पोहोचून दाह निर्माण करतात. क्षयरोगामुळे उद्‌भवणाऱ्या या आजाराचे प्रमाण जास्त आहे. २. कॅन्सरच्या पेशी शरीरात पसरल्यानंतर शेवटी मस्तिष्कआवरणाला दाह निर्माण करतात. ३. काही औषधांमुळेही आणि Vasculitis, Behcets Syndrome , Sarcoichosis, अशा आजारामुळे मेनिंजायटिस उद्‌भवतो.

**लक्षणे -** असा जंतुसंसर्ग रक्तप्रवाहामार्फत किंवा नाकाच्या पोकळीमार्फत किंवा त्वचेद्वारा होतो. एकदा असा जंतुसंसर्ग झाल्यानंतर मेंदूमधील प्रतिकारपेशी या जिवाणूंशी लढा देतात. त्यावेळेस जे घटक तयार होतात, त्यामुळे दोन पेशींमध्ये सूज निर्माण होते. केशवाहिन्यांतून पाणी बाहेर पडून सभोवताच्या मेंदूपेशींमध्ये जमा होते. परिणामी मेंदूला सूज येऊन मेंदूतील दाब वाढत जातो. त्यामुळे प्रचंड प्रमाणात डोके दुखते, मानेतील स्नायू दुखावले जाऊन आखडतात. त्यामुळे हनुवटी छातीला टेकवताना त्रास होतो. वाढलेल्या मेंदूदाबामुळे आकडी येऊ लागतात, उलट्या होतात. तीव्र प्रमाणात ताप येतो, मेंदूला झालेल्या इजेमुळे विस्मरण, स्मृतिभंग होतो. तीव्र वेदनांमुळे रुग्ण त्रासलेला, चिडलेला असतो. आवाज आणि प्रकाशाशी संवेदनशीलता वाढते. मेंदूला रक्तपुरवठा आणि प्राणवायू कमी पडू लागल्यामुळे मेंदूचे कार्य बिघडते. रुग्णाची आकलन आणि बौद्धिक क्षमता खालावते. रुग्णाला भास होऊ लागतात किंवा तो असंबद्ध बोलू लागतो.

**दुष्परिणाम-** अ. लगेच उद्‌भवणारे दुष्परिणाम- १. जंतुसंसर्गामळे शरीरात सेप्सिस होऊन रक्तदाब कमी होतो, ह्रदयाचे ठोके वाढू लागतात, श्वासाची गती वाढते, शरीराचे तापमान खूप जास्त किंवा खूप कमी होते. २. रक्तदाब खूप कमी झाल्यामुळे महत्त्वाच्या अवयवांना रक्तपुरवठा कमी होतो. ३. रक्त गोठणे. ४. मेंदूदाह निर्माण होणे. ५. आकडी येणे. ६. ए.डी.एच. संप्रेरकाच्या बिघडामुळे शरीरात पाणी साठून राहते.

**ब.** कालांतराने उद्‌भवणारे दुष्परिणाम - १. वागणुकीत आणि व्यक्तिमत्त्व बदलते. २. दृष्टिदोष ३. लकवा येऊ शकतो. ४.कर्णबधीरता. ५. बोलणे, अडखळणे किंवा बंद होणे. ६. मतिमंदत्व ७. बेशुद्ध अवस्था आणि पुढे मृत्यू येऊ शकतो.

**निदान -** १. पाठीच्या कण्यातील पाणी काढून; स्नउइंत च्नदबजनतमद्ध आणि मानेचे स्नायू आखडल्या झालेला ताठरपणा. यावरून या आजाराचे निदान सहज करता येते. त्याचबरोबर रक्ततपासणी, सी.टी. स्कॅन या तपासण्या केल्या जातात.

**केस**

एका ४० वर्षे वयाच्या महिलेला एकाएकी ताप येऊन उलट्या होऊ लागल्या, डोके प्रचंड दुखू लागले. रुग्णालयात भरती केल्यानंतर तपासण्यांमध्ये Tubercular Meningitis झाल्याचे निदान करण्यात आले. तेथील उपचारादरम्यान पेशंटची त्वचा काळसर पडू लागली. त्यांचा अशक्तपणा इतका वाढला की, सतत चक्कर येऊ लागली. दररोज संध्याकाळचा ताप चढू लागला. तब्येत दिवसेंदिवस खालावू लागली. अशा अवस्थेत त्या माझ्या दवाखान्यात भरती झाल्या.

तक्रारी - १. हातपाय दुखणे ४ महिन्यांपासून - चालताना, थोड्याशा शारीरिक कष्टांनी, उभे राहिल्यानंतर पाय दुखणे. गरम पाण्याने, दाबल्यावर, झोप काढल्यानंतर बरे वाटणे. २. मान दुखणे ५ महिन्यांपासून - थोड्याशा शारीरिक कष्टांनी मान दुखणे. ३. अधूनमधून ताप येणे. ४ महिन्यांपासून - थंडी वाजून येणे, तापात तहान कमी, तोंडात कडसर आंबट चव. ४. डोळे दुखणे - प्रकाशामुळे, सकाळच्या वेळेत डोके दुखणे. दाबल्यावर, अंधारात, झोपल्यानंतर बरं वाटणे. ५. आवाजामुळे डोके दुखणे.

**विशेष -** १. खाण्यात गोडाची, थंड पेयाची, आंबट पदार्थांची आवड. २. सतत तहान लागणे. तापात तहान न लागणे. ३. घामाचा घाण वास येणे. ४. स्वस्थ झोप न लागणे. ५. थंड प्रकृती. ६. अनियमित मासिक पाळी.

**स्वभाव - तुमच्या लहानपणाविषयी सांगा?**

मला आठ भाऊ आणि आठ बहिणी आहेत. माझा सांभाळ माझ्या सावत्र आईने केला. माझा स्वभाव मनमिळाऊ होता. माझे घरात सर्वांशी पटत असे. मी फक्त इयत्ता पाचवीपर्यंतच शिक्षण घेतले. कारण मला शिक्षणाची आवड नव्हती.

**तुमच्या वैवाहिक जीवनाविषयी सांगा?**

वयाच्या १५ व्या वर्षी माझे लग्न झाले. आम्ही सगळे एकत्र कुटुंबात राहत होतो, परंतु माझे आणि नणंदेचे सतत वाद व्हायचे. त्यामुळे आम्ही काही वर्षांनी वेगळे झालो. आता मला ३ मुले आहेत. त्यापैकी एक मुलगा ५ व्या वर्षी वारला.

**आता तुमचा स्वभाव कसा आहे?**

माझा स्वभाव सरळ आणि शांत आहे. जर कुणी माझे ऐकले नाही तरच मी रागावते. मुलांनी उलट उत्तरं दिली तर मला राग येतो. मला कुटुंबीयांबरोबर राहायला आवडते, एकटे आवडत नाही. देवावर आणि देवपूजेवर माझा खूप विश्वास आहे. घरात भांडणं झालेली मला आवडत नाहीत. त्यांच्या पतीने सांगितले की, त्यांचा स्वभाव खूप काळजीवाहू आहे. घरातील व्यक्ती आजारी पडली तर त्यांना पटकन रडू येते. ११ वर्षांपूर्वी वडील वारले, २ वर्षांपूर्वी आई वारली. पण तरी आतासुद्धा त्यांच्या आठवणींनी त्यांना रडू येते.

**काही काळजीचे कारण?**

एकत्र कुटुंबातून विभक्त झाल्यानंतर माझ्या पतीला व्यवसायात ३ लाखांचे नुकसान झाले. त्यावेळी मला खूप टेंशन आले. माझ्या मुलाचे बी. ए. पर्यंत शिक्षण झाले आहे, पण तो अजून अस्थिर आहे आणि त्याला तंबाखू व दारूचे व्यसन आहे. त्याच्या भविष्याविषयी मला सतत काळजी वाटते.

**तुम्हाला कशाची भीती वाटते?**

मला अंधाराची, भुतांची, दिवसासुद्धा एकटे राहण्याची, एकटे कुठे बाहेर जाण्याची भीती वाटते.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व -** १. काळजीवाहूपणा २. अंधाराची, भुतांची, एकटेपणाची भीती वाटणे. ३. प्रकाशाशी आणि आवाजाशी संवेदनशीलता. ४. सोबतीची गरज ५. सायंकाळी ताप येणे. ६. तापात तहान न लागणे. ७. थंड प्रकृती.

प्रथम मी त्यांना रुग्णालयात भरती केले. त्यांच्या संपूर्ण केसचा अभ्यास करून एकाच होमिओपॅथिक औषधाची मात्रा दिली. त्या दिवसापासून त्यांना ताप चढला नाही. त्यांचे जेवण सुधारले. पोटदुखी, उलट्या होणे ४-५ दिवसांत थांबले. १५ दिवसांत त्यांना स्वस्थ वाटू लागले. मग त्यांना डिस्चार्ज देण्यात आला. डिस्चार्जच्या वेळी त्यांची मान दुखणे, ताप येणे, अंग दुखणे थांबले होते.

चार महिन्यांनंतर जेव्हा त्या फेरतपासणीसाठी आल्या त्यावेळेस त्यांची काळवंडलेली त्वचा उजळली होती. वजन वाढले होते. थंडी ताप, पायदुखीचा त्रास बंद झालेला होता. त्या आता दररोज दीड किलोमीटर फिरायला जातात. घरातील कामे उत्साहाने आणि जोमाने करतात.


**पत्ता - आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल अॅण्ड फिलिंग सेंटर, तपोवन रोड, पिंपरी गाव, पुणे-१७. संपर्क - ०२०-६९३३७०८०, २७४१२५४९, २७४१२१९७**






विक्रांत आढाव


**व्यायाम चालु करताना कोणती व्यायाम पध्दती अवलंबावी यावर संदिग्धता असते. चालणे, धावणे, पोहोणे,जीममध्ये वजन उचलणे, टेकडी चढणे, सुर्यनमस्कार घालणे यांसारख्या अनेक व्यायाम पध्दती असताना कोणता पर्याय निवडावा यावरुन गोंधळेली अवस्था होते.**

## चालणे सर्वांग सुंदर व्यायाम



खरेतर धावणे व जीम मधील वजन उचलण्याचा व्यायाम यांचे मिश्रण हा सर्वात्तम पर्याय असु शकतो. मात्र कामाच्या व्यापात अथवा वेळेअभावी जर व्यायाम करण्यास वेळ देता येत नसेल तर चालणे हा सर्वोत्तम पर्याय असु शकतो. मात्र चालण्या अगोदर काही नियम स्वत:ला घालणे अत्यंत महत्वाचे ठरते. सर्वात महत्वाचे म्हणजे चालण्याकरिता शुजचा अवलंब करणे अत्यंत महत्वाचे ठरते. सदर शुज हे अत्यंत चांगल्या प्रतिचे असणे आवश्यक आहे अन्यथा दुखापतीची शक्यता बळावते. सुरवातीला संथ गती व त्यानंतर काही अंतराने वेगाने मार्गक्रमण करीत वेगात सातत्य राखणे हे योग्य फिटनेसच्या दुष्टीने अत्यंत महत्वाचे ठरते. कमीत-कमी तीन व प्रत्येकाच्या क्षमतेनुसार १० किलोमीटर चालणे आरोग्याच्या दुष्टीने महत्वाचे ठरते. रक्तदाब व मधुमेह असणाऱ्यांनी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक ठरते.

## 'डायल १०८' रुग्णवाहिका सेवेचे जनजागृती अभियान

पुणे : प्रतिनिधी

राज्य शासनाच्या आरोग्य विभाग आणि 'बीव्हीजी इंडिया लिमिटेड' या सेवा क्षेत्रातील कंपनीच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिर्सेसच्या सुसज्ज डायल १०८ सेवेच्या जनजागृती अभियानाचे विद्यार्थ्यांसाठी आयोजन करण्यात आले होते. या अभियानाअंतर्गत एकूण ३२४३ विद्यार्थ्यांना डायल १०८ सेवेच्या कार्याची माहिती देण्यात आली. या अभियानाअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या १४२ विद्यार्थी, पंडित नेहरू माध्यमिक व श्री आनंद रामजी पन्नालालजी भटेवरा उच्च माध्यमिक विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज कामशेतचे एक हजार विद्यार्थी, संगमनेर आणि अकोले तालुक्यातील शाळा आणि महाविद्यालयातील २५१ विद्यार्थी, श्री छत्रपती शिवाजी विद्यामंदीर ज्युनियर कॉलेज, काण्हे येथे ३०० विद्यार्थी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (कान्हे) चे १५० विद्यार्थी, न्यू इंग्लिश स्कूल अॅण्ड ज्युनियर कॉलेज वडगांव मावळ येथे १४०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

प्राचार्य कीसन जाधव, उपप्राचार्य भद्रे, ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख सुभाष पिंपळे, सुभाष पाटील (तंत्रज्ञान विभाग), मोरेश्वर धर्माधिकारी, प्रहिमा जव्हेरी, रंजना नेटके, ए. एस.मोरे, अनिल कुंभार आदी सहभागी झाले होते. या जनजागृती मोहिमेचे संयोजन विभागीय व्यवस्थापक डॉ. विनय यादव, जनजागृती विभागप्रमुख साहेबराव इंगळे, जिल्हा व्यवस्थापक डॉ. भूषण सोमवंशी, अतुल फडतरे, सहायक जिल्हा व्यवस्थापक, ग्रामीण विभाग बी.आर.कोळी यांनी केले होते.

## स्तनपान सप्ताहानिमित्त महिला डॉक्टर्सकडून शिबिर

पुणे : प्रतिनिधी

सांगवी येथील 'स्वामिनी महिला डॉक्टर्स ग्रुप'तर्फे जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त २ ऑगस्ट रोजी गर्भवती व स्तनपान करणाऱ्या महिलांसाठी मार्गदर्शनपर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कातेपुराम बॅडमिंटन हॉल येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरादरम्यान आलेल्या ७० हून अधिक महिलांचे रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. तसेच उपस्थित महिलांमध्ये सुजाण माता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेतील विजेत्यांना नगरसेविका वैशाली जवळकर आणि नगरसेविका शैलजा शितोळे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी स्वामिनी ग्रुपचे अध्यक्ष डॉ. वैशाली लोढा, डॉ. कोकाटे व डॉ. ज्योती मटे उपस्थित होते.


यावेळी आलेल्या गर्भवती महिला व माता यांना गर्भारपणातील काळजी व स्तनपानाबाबत मार्गदर्शन व तपासणी डॉ. मयूरी मोरे, डॉ. नेहा नाईक, डॉ. ज्योती पवार व डॉ. मोहिनी कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रत्नप्रभा चौधरी यांनी केले. आभार डॉ. अर्चना शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. लीना मुळीक, डॉ. शुभांगी पाटील, डॉ. वैशाली सांबकर, डॉ. भारती काळे व सर्व महिला डॉक्टरांनी सहकार्य केले.




स्वामी महिला डॉक्टर्स ग्रुपकडून जागतिक स्तनपान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले.

## शब्दनगरी

मंगळवार, ४ ऑगस्ट २०१५ — पुण्यनगरी



### आडवे शब्द

१. मानधनावरुन भारतीय भूमीवरुन परतणारा एक क्रिकेट संघ
५. भार्या, बायको
६. श्रीलंकेचा क्रिकेट कर्णधार
१०. गुन्हेगारांना एकामागून एक पकडण्याची क्रिया
१२. सोबत, संगत
१३. नीब लावलेली लेखणी, बोरु; धातूच्या पत्र्यावरील देवतेचा ठसा
१४. प्रणाम, वंदन; प्रार्थना
१६. कै. मच्छिंद्र कांबळी यांची भाषा
१७. निद्रा, झोप
१९. गणपतीचे आवडते पक्वान्न
२०. रज, धुली
२२. डुक्कर, सुव्वर
२४. द्रव, तरल
२६. विद्येची देवता, सरस्वती
२८. वेतन, पगार
३०. इंग्लडचा एक प्रसिद्ध फुटबॉलपटू – वेन **
३१. लोकसभेवर निवडून जाणारे लोकप्रतिनिधी
३३. जमिनीची संपूर्ण माहिती देणारा रेखांकित कागद
३५. आप्त, नातलग
३७. पसरलेले, उथळ
३९. एक जुने प्रसिद्ध हिंदी चित्रपट गीतकार – **** जयपुरी
४१. भान, शुद्धी
४३. पंख, पीस; परका
४४. भांडण, दुश्मनी
४५. लवण, मीठ
४७. ऋण; ऋषी कपूर, टिना मुनीम, सिमी गरेवाल, प्राणचा एक चित्रपट
४८. कॉम्प्युटर
५०. शराब, दारु
५२. दोन डोंगरांमधील खोल पोकळी
५३. चामडी, त्वचा
५४. कागदावर लेख लिहिताना डाव्या बाजूस मोकळी सोडलेली जागा
५६. पळून जाण्याची क्रिया
५८. हाताची ओंजळ
६०. अज, बोकड
६१. आत येणे, प्रवेश करणे
६३. कप्तान, कॅप्टन, संघनायक
६५. समूह, जमाव
६६. नवरामुलगा
६७. अटकाव, बंदी
६८. मृतदेह, कलेवर
६९. रसरशीत, रसयुक्त
७०. स्त्री, महिला
७१. मलिन, घाणेरडा
७३. इंग्रजी आद्याक्षरांतील दुसरे अक्षर; बीज
७४. महर्षी व्यासांचा पिता
७६. पिकावरील कीड
७७. वाहतूक, चलनवलन
७८. हृदय
७९. गवळ्याची पत्नी

### उभे शब्द

१. तनखा
२. जळण, सरपण
३. कोंब, अंकुर
४. देवाचे नामस्मरण करताना घ्यावयाची माळ
५. एक नागमोडी भाजी
६. एक प्रसिद्ध चित्रपट– 'अमर अकबर ***'
७. तपेली, मोठी लोटी
८. 'शोले' चित्रपटात सांबाची भूमिका करणारा अभिनेता
९. 'देवदास', 'हम दिल दे चुके सनम' या चित्रपटांतील चरित्र अभिनेत्री– स्मिता ****
११. ओढा, प्रवृत्ती
१५. साहाय्यक
१८. यव, सातू
२१. राज कपूर व नर्गिसचा एक प्रसिद्ध चित्रपट; पाऊस (हिंदी)
२३. रात्री फुले उमलणारी एक सुगंधी वनस्पती
२४. भारताचा एक प्रसिद्ध बॅडमिंटनपटू
२५. मासला, नमुना
२७. रद, दंत
२९. विशेष, निवडक
३१. चारपाई, बाजले
३२.आवड, रुची; फळाचा द्रव
३४. मंडई, हाट
३६. गावातील प्रजा, रयत
३८. हिरा, माणिक, पाचू इत्यादी प्रसिद्ध खनिज पदार्थ
४०. भस्म, राख; रक्षण
४२. रान, बन
४३. 'सर सलामत तो *** पचास'
४४. आयुर्वेदीय तज्ज्ञ, धन्वंतरी
४६. कामदेव, रतीचा पती
४८. पावसाची अविरत झड
४८. तापात अंग मोडून येण्यीच क्रिया
५०. चामखीळ
५१. कलावंत, अभिनेता
५५. परस्पर लढणे, मारपीट
५६. अमिताभ, विनोद खन्ना, शम्मी कपूर, अमजद खान, नीतू सिंग, शबाना आझमीचा एक चित्रपट
५७. जव, सातू
५९. नदीवर बांधलेला लाकडी पूल
६२. नाहक, उगाच
६४. पताळलोक
६७. उलटी होईल असे वाटणे
६८. एक ऋतू; सुप्रिया सुळे यांच्या पित्याचे नाव
७०. नाखूश, असंतुष्ट
७२. शर, तीर
७४. लहान डाव, पळा
७५. गुर्मी, मस्ती, ताठा

### कालच्या शब्दनगरीचे उत्तर



## मुलांच्या उपचारांसाठी डीईआयसी केंद्र तीन महिन्यांत होणार सुरू

पुणे : प्रतिनिधी

जन्मतःच शारीरिक व्यंग, तसेच मानसिक दुर्बलता असलेल्या अठरा वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींवर यशस्वीपणे उपचार करण्यात यावेत आणि त्यांना सर्वसामान्यपणे जीवन जगता यावे यासाठी औंध येथील जिल्हा रुग्णालयातील इमारतीमध्ये डिस्ट्रिक्ट अर्ली इंटरव्हेंशन सेंटर (डीईआयसी) हा नवीन आरोग्य विभाग उभारण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मुलांवर पूर्णपणे मोफत उपचार करण्याकरिता पुणे जिल्ह्यातील हे पहिलेच केंद्र असणार आहे. याचे काम राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत चालणार आहे.

बालकांचा जन्म झाल्यानंतर ज्यांना अतिदक्षता विभागाची गरज पडते त्यांना पुढील सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत विशेष काळजी घेण्याची आवश्यकता असते. अनेक बालकांना फिजिओथेरपी (भौतिकोपचार), दृष्टिविषयक आजार, बोलण्याविषयी चिकित्सा (स्पीचथेरपी), बहिरेपणाविषयक चिकित्सा, याबरोबरच इतर प्रकारच्या महत्त्वाच्या उपचारांसाठी बालकांवर लवकरात लवकर उपचार होणे आवश्यक असते. तसेच या उपचारासाठी बालरोगतज्ज्ञांचा वॉर्ड आवश्यक असतो. म्हणून जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी हा विभाग उभारण्यात येत आहे. याबाबत केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) आणि राष्ट्रीय बाल आरोग्य अभियानांतर्गत चालवला जाणार आहे. हा विभाग उभा करण्यासाठी एनएचएमद्वारे खर्च केला जाणार आहे. औंध येथे हा प्रकल्प आकार घेत असून, येत्या दोन ते तीन महिन्यांत हा विभाग पूर्ण क्षमतेने सुरू होणार असल्याची माहिती येथील एका वरिष्ठ डॉक्टरांनी दिली. तसेच येथे सध्या आवश्यक तज्ज्ञ डॉक्टर व इतर पदे भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. सध्याही हा विभाग काही प्रमाणात सुरू असून, येथे बालकांवर भौतिकोपचार व इतर उपचार करण्यात येणार आहेत. या विभागात राष्ट्रीय बाल आरोग्य अभियान (आरबीएसके)च्या अंतर्गत जिल्हा पातळीवर जी पथके कार्यरत आहेत, त्यांच्याकडून उपचारासाठी बालकांना पाठविण्यात येणार आहेत. ही पथके राज्यातील सर्व शाळांत जाऊन बालकांची तपासणी करतात. यामध्ये त्यांना बालकांमध्ये काही शारीरिक किंवा मानसिक आजार आढळल्यास त्यांना येथे उपचारासाठी पाठविण्यात येते. औंध रुग्णालयातील डीईआयसी केंद्रात काही उपचार सुरू करण्यात आलेले आहेत. दररोज येथे ४० ते ५० बालकांवर उपचार करण्यात येत आहेत, अशी माहिती येथील एमएसडब्ल्यू अरविंद पाईकराव यांनी दिली.

### बालकांना उपचार न मिळाल्याच्या तक्रारी

**डीईआयसी हे सेंटर सुरू झाल्यानंतर आरबीएसके द्वारा उपचारासाठी पाठविण्यात आलेल्या बालकांवर उपचार केले जात नसल्याची तक्रार आहे. अश्विनी पोखरकर या मुलीला डाउन सिंड्रोम हा आजार होता. तिला आरबीएसके डॉक्टरांच्या पथकाने जिल्ह्यातील एका खेडेगावातून उपचारासाठी डीईआयसी सेंटर येथे पाठविले होते. मात्र येथे आल्यानंतर तिला उपचार होत नसल्याचे सांगण्यात आले. यानंतर त्या मुलीवर एका खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात येत असल्याची माहिती आरबीएसकेच्या एका डॉक्टरांनी दिली.**